"OUR SOLUTION RISES TOU BETTER"
SUCCESS CLASSES
Starts on 1st July
No. 1 coaching institute for improvement of students
Admissions open
MHT-CET, 11th sci.
JEE-Mains
Limited Admission
Add-Opp.to Sangola S.T.Stand,Bhopale Road, Sangola
7387851467/ 8830602065

माणदेशाच्या विकासावर दृष्टिक्षेप टाकणारे पुरोगामी विचारसरणीचे एकमेव दैनिक

# माणदूत एक्सप्रेस

स्थापना २००२

email- mandootexpress5@gmail.com

www.mandootexpress.com

संपादक–मोहन मस्के मो.९८५०४०३७७३

■ सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, आटपाडी, जत, सोलापूर, सांगली ■

चौंगुले सायन्स क्लासेस
(NEET, JEE, MHT-CET)
11th+12th
Science Batch
PHYSICS, CHEMISTRY, MATHS, BIOLOGY, MARATHI, ENGLISH
Mob.7620020178 / 9545642803
पत्ता : न्यू इंग्लिश स्कूल जवळ, सांगोला.

वर्ष–२३ वे | अंक –१२ | पृष्ठे–४ | मूल्य – १ रुपये | शनिवार दि.२६ ऑक्टोंबर २०२४ | R.N.I. NO. MAHMAR/2002/10619

हॉटेल सितारा
सांगोला महाविद्यालय शेजारी, कडलास रोड सांगोला
7998065555 / 7998065555 / 9193205555
लक्षवेदी टेरेस गार्डन
गार्डन डायनिंग हॉल
प्रशिक्षित महिला स्टाफ
पार्टीसाठी अनेक पर्याय
AC / Delux रूम्स
मोठी सुसज्ज पार्किंग
FREE WiFi
24x7 ग्राहक सेवा



# सांगोला तालुक्यात हरितक्रांती घडविणार : आ.शहाजीबापू पाटील

## महायुतीचे उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांचे चिकमहुद येथे जंगी स्वागत व सत्कार संपन्न



सांगोला (प्रतिनिधी):– १९९० पासून तालुक्याच्या राजकारणात अनेक चढउतार पाहिले. ७ वेळा विधानसभा निवडणूक लढविली. तालुक्याला लागलेला दुष्काळाचा कलंक पुसण्यासाठी मी माझे आयुष्य पणाला लावले. १९९५ व २०१९ ला आमदार झाल्यानंतर तालुक्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती आली. टेंभू, म्हैसाळ, उजनीचे पाणी तालुक्याला आणले त्यातून निश्चितपणे शेतीचा व शेतकऱ्याचा विकास होणार आहे. तालुक्यात हरितक्रांती घडविण्याचे माझे स्वप्न पूर्ण होत आहे यात खरा आनंद आहे, असे विचार आमदार शहाजीबापू पाटील यांनी चिकमहुद येथे व्यक्त केले.

२५३ सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील हे शुक्रवार दि.२५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मुंबईवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतून एबी फॉर्म घेऊन महुद येथे आले. यावेळी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या स्वागत व सत्कारासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमप्रसंगी आमदार शहाजीबापू पाटील बोलत होते.

पुढे बोलताना आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, सांगोला तालुका मजूर पुरवठा करणारा तालुका म्हणून तालुक्याची ओळख होती. हे चित्र बदलण्यात आले आहे. तालुक्यात लवकरच मोठ्या प्रमाणात शेती सिंचनाखाली येत असून तालुक्यातील एकही गाव शेतीच्या व पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहणार नाही .पुढील वर्षाच्या दिवाळीपूर्वी प्रत्येकाच्या शेतात पाणी पाहायला मिळेल अशी ग्वाही आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली. तसेच विरोधक माझ्यावर मोकळी टीका करतात .आधी त्यांनी काय केले हे तपासावे. या विधानसभा निवडणुकीत दीपकआबा साळुंखे यांना पुन्हा एकत्रित आणण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मला १ लाख २५ हजार मते मिळतील अशी खात्री व विश्वास आहे. भविष्यात एकनाथ शिंदे यांच्या विचाराला प्रोत्साहन देण्यासाठी राज्याच्या व तालुक्याच्या विकासासाठी सर्वांनी मोठ्या मनाने मतदान करावे, असे आवाहन बापुंनी यावेळी केले.

चिकमहुद येथे सत्कार व स्वागत समारंभासाठी रेखाताई पाटील, वृषाली पाटील, वैशाली पाटील, राजलक्ष्मी पाटील, सरपंच शोभा कदम, ग्रामपंचायत सदस्य सुनीता हुबाले, सोनाली काटे, दीक्षा कदम, सागरदादा पाटील, शिवसेना महिला आघाडी जिल्हाध्यक्षा मुबिना मुलाणी, दिग्विजयदादा पाटील, बाळासाहेब आसबे, संजय मेटकरी, बालाजी बागल, प्रितेश दिघे, समीर पाटील, दीपक ऐवळे , अजितकुमार ताटे ,सुभाष इंगवले, दिलीप कारंडे ,आप्पासाहेब सरगर, जगदीश पाटील, मधुकर कदम, शिवाजी घेरडे, लक्ष्मण भोसले आदी शिवसेना, युवा सेना पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते विजयदादा शिंदे, दादासाहेब लवटे, नितीन गायकवाड ,एन वाय.भोसले सर, दीपक दिघे, दत्ता नागणे ,पांडुरंग हाके ,राजनंदनी पाटील, श्रीकांत पाटील, पंकज काटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

शहाजीबापू पाटील हे सोमवारी दि २८ ऑक्टोबर २०२४ रोजी आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. यावेळी मोठे शक्तीप्रदर्शन करण्यात येणार असून विरोधकांना याची निश्चितपणे चपराक बसेल.

आमदार शहाजीबापू पाटील यांच्या सत्कार समारंभासाठी व स्वागतासाठी चिकमहुद येथे जंगी तयारी करण्यात आली होती. फटाक्यांची आतषबाजी व जेसीबीतून फुलांची उधळण करीत आमदार शहाजीबापू पाटील यांचे चिकमहुद ते जंगी स्वागत करण्यात आले .सत्कार झाल्यानंतर कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शन सभा आयोजित केली होती. यावेळी हजारोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. या कार्यक्रमासाठी बंधू आणि भगिनींची विशेष गर्दी पाहिला मिळाली.

# लढायचं आणि जिंकायचं, जनसेवेचा निर्धार– डॉ.बाबासाहेब देशमुख

## विठूरायाचा घेतला देशमुख बंधूनी आशिर्वाद; फोडला प्रचाराचा नारळ



सांगोला (प्रतिनिधी):– सांगोला विधानसभा मतदार संघातील मायबाप जनतेसाठी अखंड काम करीत रहावे, याच शुद्ध भावनेतून पुढील पाच वर्षातील प्रत्येक दिवस मायबाप जनतेच्या सेवेसाठी असेल. गेली अनेक वर्ष स्वर्गीय आबासाहेबांना सांगोल्याच्या विकासासाठी जनतेने साथ दिली. त्याचप्रमाणे सांगोलाकरांची सेवा करण्याची संधी मला द्यावी. त्यांच्या विश्वासाला पात्र ठरेन. सेवेचे हे पर्व अखंड सुरू ठेवण्यासाठी येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी आपले अमूल्य मत मला द्यावे. जनतेचे आशीर्वाद घेण्यासाठी गावोगावी जाणार आहे. २३ नोव्हेंबरला जनता माझ्या नव्हे तर सर्व सांगोलावासीयांच्या विजयाचा जल्लोष साजरा करणार आहे. पंढरपुर येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठलाचे व माता रुक्मिणीचे शेकाप उमेदवार डॉ. बाबासाहेब देशमुख व डॉ. अनिकेत देशमुख यांनी मनोभावे दर्शन घेऊन प्रचाराचा नारळ फोडला. व विठ्ठल चरणी साकडे घालत भेदभाव नष्ट करत समता प्रस्थापित करण्याचे बळ विठ्ठलाकडे मागीतले आणि समस्त सांगोलाकरांच्या उद्धारासाठी विठुरायाचरणी प्रार्थना केली. अशी माहिती डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

यावेळी डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले, आबासाहेबांच्या पश्चात नेतेमंडळी आमची चेष्टा करीत होती. त्यांचे विचार ,निष्ठा सोडून नेते मंडळी इकडून तिकडून गेली. मात्र, ज्याला लढायचे आहे. त्यांनी तिरंगी, चौरंगी, पंचरंगी लढावे. केवळ कोणीही डरकाळ्या फोडू नये, रिंगणात उतरावे. आम्ही तयार आहेत. सांगोल्यात लाल बावटाच फडकणार आहे .

डॉ.अनिकेत देशमुख म्हणाले, आम्हा देशमुख कुटुंबात वादच नव्हताच. विरोधकाकडून आमच्या दोघात मोठे मतभेद असल्याचे जाणिवपुर्वक पसरविण्यात आले. आम्हाला आमिषे दाखवली गेली; परंतु आबासाहेबांनी कार्यकर्त्यांची बांधलेली मोळी आम्ही दोघे सहजासहजी सोडणार नाही. समोर कोण आहे याची चिंता आम्हाला नाही.जनता विकासाला साद घालणार आहे असे मत डॉ. देशमुख यांनी व्यक्त केले.

# भाग्योदय अर्बन सोसायटीचा उद्या वर्धापन दिन; भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन





सांगोला(प्रतिनिधी):–भाग्योदय अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी सांगोला च्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त उद्या रविवार दि.२७ ऑक्टोबर रोजी भाग्योदय अर्बन सोसायटी, जयभवानी चौक, सांगोला येथे भव्य रक्तदान शिबीर आयोजित केले असल्याची माहिती संस्थापक चेअरमन श्री.हरी बंडा मेटकरी (सर) व व्हा.चेअरमन पांडुरंग सदाशिव देशमुख यांनी दिली.

वर्धापन दिनानिमित्त उद्या रविवार दि.२७ रोजी सकाळी १०.०० वा.पासून पर्यंत भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सर्वाच्या प्रेमाने व सहकार्याने संस्थेने अल्पावधीत गरुड झेप घेतली असुन संस्थेने तीन वर्षाच्या कालावधीत १२८ कोटी रू. ची उलाढाल करून अत्यंत समाधानकारक प्रगती केली आहे.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक श्री. पोपट जानकर (सर), श्री. हरीदास येडगे, श्री. बंडोपंत वाघमोडे, श्री.कामाजी नायकुडे, श्री.आदम मुलाणी, श्री.जालिंदर पारसे, सौ. भारती दगडू वाघमोडे, श्री.अशोक देशमुख, श्रीमती संगीता बंडगर, ॲड.तुकाराम ढेरे (कायदे सल्लागार), श्री.फिरोज मणेरी (सल्लागार संचालक), श्री.प्रविण वाघमोडे (सचिव) यांनी केले आहे.

# सांगोला विधानसभा मतदार संघासाठी चौथ्या दिवशी १३ नामनिर्देशन पत्राची विक्री

सांगोला (प्रतिनिधी):–२५३ सांगोला विधानसभा मतदार संघ सार्वत्रिक निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज स्विकारण्याच्या चौथ्या दिवशी शुक्रवार दि.२५ ऑक्टोबर २०२४ रोजी ११ उमेदवारांनी १३ अर्जाची खरेदी केली आहे.सांगोला विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी चौथ्या दिवसाअखेर ६४ उमेदवारांनी ९३ अर्ज खरेदी केली असून दोन उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असल्याची माहिती माहिती निवडणूक निर्णय अधिकारी भैराप्पा माळी यांनी दिली.

अर्ज दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी श्री. शशिकांत सुभाष गडहिरे (अपक्ष), डॉ.सुदर्शन मुरलीधर घेरडे २ अर्ज (बहुजन समाज पार्टी), श्री.मारुती दगडू जाधव (परिवर्तन आघाडी), श्री.मारुती दगडू जाधव (अपक्ष), श्री.धनाजी दत्तात्रय पारेकर (स्वराज्य निर्माण सेना), श्री.शाहरुख शाफिक तांबोळी (अपक्ष), श्री.तुकारामदादा केशवराव शेंडगे (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), श्री.अमर बबन सोनवने २ अर्ज (बहुजन समाज पार्टी), श्री.पियुष प्रदीप पाटील (अपक्ष), श्री.नागेश पांडुरंग जोशी (अपक्ष), श्री.शोकत अब्दुल मुलाणी (अपक्ष) असे एकूण १३ अर्ज खरेदी करण्यात आले. तर चौथ्या दिवशी राजाराम दामू काळेबाग रा.अचकदानी (अपक्ष) व ज्ञानेश्वर संभाजी उबाळे रा.वाकी शिवणे (अपक्ष) यांनी अर्ज दाखल केले.

# रोटरी क्लब सांगोला यांचे जागतिक पोलिओ दिनानिमित्त दिघेवाडी शाळेवर व्याख्यान




सांगोला (प्रतिनिधी):– रोटरी क्लब सांगोला यांच्या वतीने आज जागतिक पोलिओ दिन साजरा करण्यात आला. संपूर्ण जगामध्ये बोलून निर्मलांसाठी रोटरी मोठ्या प्रमाणात काम करते. रोटरीच्या प्रयत्नामुळेच जगभरातील पोलिओ निर्मूलनाच्या मार्गावर आहे. या दिनाच्या औचित्य साधून रोटरी क्लब सांगोला यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दिघेवाडी (वाढेगाव) येथे पोलिओ या विषयावर माहितीपूर्ण असे व्याख्यान आयोजन करण्यात आले.यामध्ये व्याख्याते रो.इंजि.संतोष भोसले यांनी मुलांना समजेल अशी अत्यंत सोप्या पद्धतीने माहिती दिली. मुलांमध्ये या रोगाची जनजागृती करण्यात आली. शालेय मुलांना फलकाद्वारे पोलिओ बाबतच्या खबरदारी ची माहिती देण्यात आली.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री.पाटील सर, श्री.साळुंखे सर, श्री.आहेरकर सर, सौ.पाटील मॅडम, श्री लवटे सर यांचे सहकार्य लाभले. यावेळी रोटरी मार्फत शाळेचा यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.इंजि.विकास देशपांडे व आभार प्रदर्शन रो. इंजि.विलास बिले यांनी केले.

स्कीन क्लिनिक
डॉ.करमुडे यु.एम. एम.बी.बी.एस.एम.डी.पुणे (त्वचारोग तज्ज्ञ)
मो.७०८३३३४४३४, ९९७५७०७७२७
सेवानिवृत्त प्रमुख डॉक्टर, त्वचारोग विभाग, ससून हॉस्पिटल, पुणे
ठिकाण:– सांगोला, म.फुले चौक (पुतळ्याजवळ), महात्मा फुले संकुल, तळमजला, बी–१ (नवीन इमारत)

डॉ.करमुडे यु.एम.
वेळ–दररोज दुपारी १२ ते सांय.५ (शनिवारी बंद)

# आलदर हॉस्पिटल मध्ये फिट-झटके आलेल्या ६ महिन्याच्या बाळावर यशस्वी उपचार




सांगोला (प्रतिनिधी):– आलदर हॉस्पिटल मध्ये महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतून जत तालुक्यातील वाळेखिंडी या गावातील बाळावर मोफत उपचार करण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून बाळाला रात्री १ वाजता अचानक फिट झटके आल्यामुळे बाळाचे नातेवाईक ताबडतोब बाळाला हॉस्पिटल मधे घेऊन आले . बाळावर त्वरित उपचार चालू केल्यामुळे बाळाचे फिट झटके थांबण्यास सुरवात झाली.त्या नंतर बाळाचे रक्त तपासणी, MRI , EEG करण्यात आले . बाळा ची प्रकृती ७ दिवसा मधे पूर्ण सुधारल्या नंतर घरी डिसचार्ज देण्यात आला . सर्व उपचार आलदर हॉस्पिटल मध्ये मोफत करण्यात आले आहेत.

डॉ.महावीर आलदर (बालरोगतज्ज्ञ) यांनी या बाळावर यशस्वी उपचार मोफत करून डिस्चार्ज दिल्याने नातेवाईक आनंदित झाले व नातेवाईकांनी रुग्णालयात अतिशय उत्तम सुविधा मिळाली ह्याचा अनुभव व्यक्त केला.नातेवाईकांना जेवण, औषधे व इतर सर्व सुविधा रुग्णायलातून मोफत व उत्तम देण्यात आल्यामुळे नातेवाईकांनी आलदर हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टर्स व इतर स्टाफचे आभार व्यक्त केले. तरी सर्व गरजू रुग्णांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.आलदर यांनी केले आहे.

माणदूत एक्सप्रेस
शनिवार
दि.२६ ऑक्टोंबर २०२४

# राष्ट्रपती राजवट कशासाठी....

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांची घोषणा झाल्यापासून राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. एकीकडे आघाडी व युतीमधील जागा वाटपासाठी बैठका होत असताना दुसरीकडे उमेदवारी वाटप व नाराजांची मनधरणी अशा घडामोडी घडत आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमाबाबत विरोधकांकडून शंका उपस्थित केल्या जात आहेत. शिवसेना (उद्धव ठाकरे) गटाचे प्रवक्ते व राज्यसभा खासदार संजय राऊतांनी यासंदर्भात माध्यमांशी बोलताना राष्ट्रपती राजवटीची शक्यता वर्तवली. पण खरेच महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू होऊ शकते का? हा प्रश्न समोर आला आहे.कुणी म्हटल्याने राष्टपती राजवट लागू होत नसते. हरियाणा व जम्मू-काश्मीरच्या निवडणुका यंदा एकत्र घेण्यात आल्या आणि महाराष्ट्र व झारखंडच्या निवडणुका जवळपास दीड महिन्याच्या काळानंतर घेण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर विरोधकांनी निवडणूक आयोगावर टीका केली. २०१९ मध्ये महाराष्ट्र व हरियाणा निवडणुका एकत्रच झाल्या होत्या. पण यावेळी हरियाणा निवडणुकीची घोषणा १६ ऑगस्ट रोजी केली व ५ ऑक्टोबर रोजी तिथे मतदान झाले. तर दुसरीकडे महाराष्ट्रात १५ ऑक्टोबर रोजी निवडणुकीची घोषणा झाली असून २० नोव्हेंबर रोजी राज्यात मतदान होणार आहे. राज्यातल्या विद्यमान विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे. त्यामुळे त्याआधीच राज्यात नवीन विधानसभा अस्तित्वात येणे आवश्यक आहे. पण २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे सरकार स्थापन करण्यासाठी मधल्या काळात अवघे तीन दिवस मिळणार असल्यामुळे या वेळापत्रकावरून संशय व्यक्त केला जात आहे. यातूनच भारतीय जनता पक्षानं महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्याचे कारस्थान रचल्याचा आरोप केला जाऊ लागला आहे. त्यात मविआला सत्तेपासून लांब ठेवण्याचा हा भाग असल्याची टीकाही विरोधकांकडून केली जात आहे. राऊतांनी आरोप केल्याप्रमाणे महाराष्ट्रात खरंच राष्ट्रपती राजवट लागू होऊ शकते का? यासंदर्भात नेमके काय नियम आहेत? याबाबत आता चर्चा होऊ लागली आहे. महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या हेतूनेच निवडणूक आयोगाने हे वेळापत्रक ठरवल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. यामुळे कोणत्याही आघाडीला सरकार स्थापन करण्यासाठी अत्यंत कमी म्हणजेच अवघ्या तीन दिवसांचा कालावधी मिळेल, असा तर्क विरोधकांकडून लावला जात आहे. २० तारखेला मतदान आहे आणि २६ तारखेच्या आत नवीन सरकार स्थापन व्हायला हवे. सर्वसाधारणपणे इतका कमी कालावधी ठेवला जात नाही. मविआच्या विजयानंतर आमदारांना महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून इथे यावे लागेल. त्यांचा विधिमंडळ पक्षनेता निवडावा लागेल. महाराष्ट्र हे एक मोठं राज्य आहे. या सगळ्या प्रक्रियेला वेळ लागेल. पण अमित शाहांना मविआ सरकार स्थापन होऊ द्यायचे नाहीये. त्यांना २६ नोव्हेंबरनंतर लगेच राष्ट्रपती राजवट लागू करायची आहे. त्यामुळेच इतका कमी कालावधी दिला आहे'', असा राऊतांचा दावा आहे. महाविकास आघाडीच्या मतदारांची नावं यादीतून हटवून भाजपा निवडणूक लढवत आहे अशा मतदारसंघांत बोगस मतदारांची नावं समाविष्ट केली जात आहेत, असाही दावा राऊतांनी केला. याआधी त्यांनी निवडणूक जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष मतदान होण्यात प्रचारासाठी अत्यंत कमी कालावधी दिल्याबद्दलही टीका केली होती. निवडणूक कार्यक्रम ठरण्यामध्ये हवामान, उत्सव, सुरक्षा दलाची उपलब्धता, विद्यार्थ्यांच्या परीक्षा अशा इतर बाबींचा निवडणूक आयोगाकडून विचार केला जातो. पण निवडणूक वेळापत्रक ठरवताना सर्वात महत्वाची बाब लक्षात घेतली जाते ती म्हणजे विद्यमान विधानसभेची अंतिम मुदत. त्याआधी निवडणुका घेतल्या जायला हव्यात, असे नियमात नमूद आहे. घटनेच्या कलम १७२ (१) नुसार, राज्य विधानसभांचा कार्यकाळ पाच वर्षांसाठी निश्चित करण्यात आला आहे. ''प्रत्येक राज्याची विधानसभा जर आधीच विसर्जित झाली नसेल, तर पहिल्या सभेपासून पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी कार्यरत राहू शकते. पाच वर्षांची मुदत ज्या दिवशी संपेल, त्यानंतर ही विधानसभा विसर्जित झाल्याचे समजले जाईल'', असे राज्यघटनेत नमूद आहे. त्याशिवाय, लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ च्या कलम १५ नुसार कोणत्याही निवडणुकीसाठीची अधिसूचना संबंधित विधानसभेच्या अंतिम मुदतीच्या सहा महिने आधीच्या तारखेपर्यंत काढता येऊ शकेल. कोणतीही निवडणूक पूर्ण करण्यासाठी निश्चित अशा कालावधीची नोंद या नियमामध्ये करण्यात आलेली नाही. मात्र, असे असले तरी ही सर्व प्रक्रिया संबंधित विधानसभेच्या अंतिम मुदतीनंतर सहा महिन्यांच्या आत पूर्ण करणं क्रमप्राप्त असतं. नियमानुसार नवनिर्वाचित आमदारांची यादी राज्यपालांकडे सोपवल्यानंतर निवडणूक आयोगाची भूमिका या टप्प्यावर संपते. तिथून पुढे राज्यपाल विधानसभेचं विशेष अधिवेशन घेऊन नव्याने निवडून आलेल्या आमदारांना शपथ देतात. साधारणपणे निवडणूक आयोगाकडून निवडणूक निकाल ते सरकार स्थापनेची मुदत यामध्ये पुरेसा अवधी दिला जातो. मात्र, हा अवधी कमी झाल्याचं गेल्या काही उदाहरणांवरून दिसून येत आहे. विशेषत: सिक्किम व अरुणाचल प्रदेशच्या नव्या विधानसभा विद्यमान विधानसभेची मुदत संपण्याच्या दिवशीच अस्तित्वात आल्या. मात्र, मुदत उलटल्यानंतरही जर नवीन विधानसभा अस्तित्वात येऊ शकली नाही, तर मात्र राज्यपाल राष्ट्रपती राजवटीचा पर्याय निवडू शकतात,असे बोलले जात आहे पण वास्तवात तसे नाही.सहजासहजी राष्ट्रपती राजवट लागू करता येत नाही.एखाद्या पक्षाने बहुमत मिळवल्यास राज्यपालांना त्या पक्षाला सत्तेसाठी पाचारण करावे लागते.तिथे राज्यपाल असोत वा अमित शहा.त्यांना लुडबुड करताच येणार नाही.जर त्रिशंकू अवस्था झाली तर शहा हे फोडाफोडीचे राजकारण करतील पण निष्कारण कुणालाही ढवळाढवळ करता येणार नाही.बहुमताच्या सरकारवर जर डोळा ठेवला तर तो प्रकार लोकशाहीचा घात करणारा ठरेल,हे भाजप नेत्यांनी ध्यानात ठेवायला हवे.दुसरी बाब म्हणजे राऊतांना काही तरी वक्तव्य करून खळबळ उडवून द्यायची असते.राऊतांनी हा उद्योग थांबवला पाहिजे.

माणदूत एक्सप्रेस हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक मोहन शंकर मस्के यांनी भास्कर प्रिटींग प्रेस प्रा.लि. रामदेव वेअर हाऊस, हैद्राबाद रोड, सोलापूर (महाराष्ट्र) येथे छापून १०३२/२ ब लोहार गल्ली, सांगोला ता.सांगोला जि.सोलापूर पि.नं.४१३३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशीत केले.

माणदूत एक्सप्रेस

EMail: mandootexpress5@gmail.com

दै.माणदूत एक्सप्रेसमधील प्रसिध्द होणाऱ्या बातम्या, जाहीराती व लेखातील मजकूरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांची गुजरात येथील कंपनीस औद्योगिक भेट




सांगोला (प्रतिनिधी):- येथील फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांची तीन दिवसीय औद्योगिक भेट JB PHARMACEUTICALS दमन गुजरात येथे झाली. या भेटीमध्ये कंपनीतील टॅब्लेट या फॉर्म्युलेशनची माहिती कंपनीचे कार्यकारी उपाध्यक्ष श्री पी व्ही बंग यांनी विद्यार्थ्यांना दिली.

कंपनीमध्ये प्रत्येक विभागात फॉर्म्युलेशनची तयार करत असताना काळजी कशी घ्यावी याची सविस्तर माहिती दिली. पदवी अभ्यासक्रमामध्ये औद्योगिक भेट हा आवश्यक घटक आहे या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच कंपनीतील कोच, औषध कंपनीची सध्याची परिस्थिती, नवीन तंत्रज्ञान या गोष्टींची माहिती मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास हातभार लागतो. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकाचे निरसन करून घेतले.

सदर औद्योगिक भेट प्रा.अमोल पोरे व प्रा. गोपिका डोंगरे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय बैस यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. तृतीय वर्षातील ४५ विद्यार्थ्यांनी या भेटीचा लाभ सर्वांगीण विकासासाठी करून घेतला. या औद्योगिक भेटीबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.भाऊसाहेब रुपनर, व्यवस्थापकीय संचालक डॉ.अमित रुपनर, कार्यकारी संचालक श्री.दिनेश रुपनर व परिसर संचालक डॉ.संजय आदाटे यांनी विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

# जिल्ह्यात ११ विधानसभा मतदारसंघासाठी तीन निवडणूक खर्च निरीक्षक यांची नियुक्ती

## सांगोला विधानसभेसाठी के.पी.जयकर यांची नियुक्ती

सोलापूर (प्रतिनिधी):- भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला असून २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान तर दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणीची प्रक्रिया होणार आहे. जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदार संघासाठी राजकीय पक्ष व उमेदवारांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकाऱ्यांची निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

निवडणूक खर्च निरीक्षक यांचे नावे व खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आलेले विधानसभा मतदार संघ पुढीलप्रमाणे-

**श्री.के.पी.जयकर-**

श्री.के.पी.जयकर हे केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. पंढरपूर, माळशिरस व सांगोला या तीन विधानसभा मतदारसंघासाठी ते निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत. उपरोक्त तीन विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्चाची संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ती तक्रार ९९ ६२ ४५ २५ ० २ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा jeyakar.mzgmail.com या मेल्वर करावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

**श्रीमती बी. ज्योती किरण-**

ह्या केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. करमाळा, माढा, बार्शी व मोहोळ या चार विधानसभा मतदारसंघासाठी त्या निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत. उपरोक्त चार विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना निवडणूक खर्चाशी संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ९०२२२७२३७७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा exmadha2024gmail.com या मेलवर करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

**श्री.मीना तेजराम श्रीमनलाल-**

हे केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. सोलापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य, अक्कलकोट व सोलापूर शहर दक्षिण या चार विधानसभा मतदारसंघासाठी ते निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत.उपरोक्त चार विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना निवडणूक खर्चाशी संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ९२२६८६४९८२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा exsolapur2024gmail.com या मेलवर करावे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बलवडी तर्फे रविराज शेटे यांचा सत्कार

नाझरे (वार्ताहर):- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बलवडी ता. सांगोला वतीने सांगोला तालुका ग्रामीण पत्रकार संघटनेचे अध्यक्षपदी रवीराज शेटे यांची निवड झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब खुळपे, उपाध्यक्ष चांगदेव तात्या शिंदे, मुख्याध्यापक मनोहर पवार, सरपंच माऊली राऊत यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

सदर प्रसंगी सरपंच ज्ञानेश्वर राऊत, माजी उपसरपंच समाधान शिंदे, मुख्याध्यापक मनोहर पवार यांनी शेटे सरांच्या कार्याचा आढावा सांगितला. तसेच सत्कारमूर्ती रविराज शेटे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुरेश गुरव, शिवाजी शिंदे, दिगंबर धायगुडे गुरुजी, वसंत राऊत, शिक्षक विजयकुमार शिंदे, सागर गुरव, रणजीत शिंदे, शिक्षिका स्वाती पाटील, सोनल सावंत, योगिता शांत, विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी शिक्षक गोरख बनसोडे यांनी आभार मानले.

# तिसरी ते बारावीपर्यंत मराठी अनिवार्य!

## राज्य अभ्यासक्रम आराखड्याबाबत तज्ज्ञांचे स्पष्टीकरण

मुंबई: नुकत्याच जाहीर झालेल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात पहिलीपासून हिंदी अनिवार्य केल्याची ओरड निरर्थक असून, प्रत्यक्षात या आराखड्यानुसार तिसरी ते बारावीपर्यंत राज्यातील कोणत्याही माध्यमाच्या शाळेत मराठी अनिवार्य आहे. पहिली भाषा कन्नड, उर्दू, गुजराती असली, तरीही दुसरी भाषा इंग्रजी आणि तिसरी भाषा मराठीच असावी लागेल.


'राज्य अभ्यासक्रम आराखडा- समज आणि गैरसमज' या विषयावर आयोजित केलेल्या परिषदेत हा आराखडा आखण्यात सक्रिय भूमिका बजावलेल्या शिक्षणतज्ज्ञांनी विविध विषयांबाबत सखोल चर्चा केली. आराखड्यातील तरतुदी, त्यांची व्याप्ती आणि त्या प्रत्यक्षात उतरवण्यात येऊ शकणाऱ्या अडचणी, यांबाबत या परिषदेत साधकबाधक चर्चा झाली.

'सीबीएसई'च्या धर्तीवर अभ्यासक्रम, 'सीबीएसई'प्रमाणे शाळांचे वेळापत्रक, हिंदी भाषेला प्राधान्य, गणित-विज्ञान विषयांबाबत 'मवाळ' भूमिका, अशा विविध मुद्द्यांमुळे राज्य अभ्यासक्रम आराखड्याबाबत विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यात अनेक गैरसमज पसरले आहेत. मात्र, हा आराखडा नेमका काय आहे, त्यातील तरतुदी काय आहेत, शिक्षण क्षेत्रावर त्याचा परिणाम काय होईल, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणसंस्था, पालक यांची भूमिका काय असेल, असे विविध मुद्दे उलगडून सांगण्यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स'ने 'राज्य अभ्यासक्रम आराखडा- समज आणि गैरसमज' हा परिसंवाद आयोजित केला.

गाळा भाडयाने देणे आहे.
महात्मा फुले चौकातील कॉटनकिंग कपड्याच्या दुकानच्या खालील गाळा भाड्याने देणे आहे.
संपर्क:9767836938

केशरमाती रोपवाटीका
भैरवनाथ 9765505152
ओंकार 9665945700
आमच्याकडे सर्व प्रकारची शोभेची झाडे, फुलांची झाडे व सर्व प्रकारचे पाम व तसेच सर्व प्रकारची जंगली झाडे होलसेल दरामध्ये मिळतील.
तसेच सर्व प्रकारचे लॉन व गार्डनची कामे करून मिळतील.
पत्ता: सांगोला-पंढरपुर रोड, फॅबटेक कॉलेज समोर, सांगोला, ता.सांगोला जि-सोलापूर ४१३३०७

## माणदूत एक्स्प्रेस शब्दकोडे क्र. १५७



**उभे शब्द :** १) दार
२) यशाचे गुपित, रहस्य
३) सिंह (हिंदीत)
४) नाहक
५) लहान बाळाला टोचतात ती
६) बिल्डिंग (मराठीत)
७) पुरंदरच्या लढाईतील औरंगजेबाचा एक सरदार
११) या कंपनीचे च्यवनप्राश प्रसिध्द आहे १२) मुली केसांना बांधतात ते कापड, फित १३) ध्वनी
१५) कविता रचणारा
१७) ग्रॅज्युएट (मराठीत)
१८) बिहारचे एक माजी मुख्यमंत्री
२०) छ. शिवरायांचा गुप्तहेर प्रमुख- *** नाईक
२१) भारतीय लष्करातील सैनिकांना पराक्रमाबद्दल देतात ते एक मेडल
२३) खिडकीची किंवा दाराची काच
२४) जमाव, समूह
२६) विलंब, वेळ होणे
३३) सर **** तो पगडी पचास
३५) खाडिलकरांचे वृत्तपत्र
३६) शिखांचे गुरू ***
३८) पतीचा भाऊ
४२) शाहिराचे वाद्य

**आडवे शब्द :** १) पुणे येथील प्रसिध्द गणपती
७) भारताची राजधानी ८) एक विदेशी मद्य ९) सक उलट लिहा
१०) सरळ नसलेला, वक्र १२) जुन्या हिंदी चित्रपटातील अभिनेत्री-** रॉय
१३) नौदल १४) व्यर्थ बडबड १६) दिव्यातील कापसाची वळई
१७) जुन्या हिंदी चित्रपटातील अभिनेत्री-**** बॉबी
१८) शरम १९) बन उलट लिहा २१) अधिकाराचे स्थान
२२) नवरी लग्नावेळी नेसते ती उच्च प्रतीची साडी
२३) साठ मिनिटांचा काळ २५) ताक घुसळण्याचे लाकडी साधन
२६) भाजपच्या महिला नेत्या-** भारती २७) भारताचे एक माजी राष्ट्रपती
२८) मध गोळा करणारी माशी २९) अंतराळ संशोधन करणारी एक संस्था
३०) अजित पवारांना या नावाने संबोधतात ३१) शूर, पराक्रमी
३२) फळातील गोड द्रव २४) डोळे, लोचन
३७) वस्तू आणण्यासाठीची लिस्ट ३९) झेड आधीचे अक्षर
४०) मऊ, टणक नसलेले ४१) दरीचा कोसळलेला भाग
४३) नंबर ४४) मोठे तळे
४५) उपवासादिवशी घ्यायचा अल्प आहार

### शब्दकोडे क्र. १५६ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | म | ता | बॅ | न | र्जी | | हा | र्दि | क | | |
| नो | | क | ट | | | पा | व | | र | ग | ड |
| ह | ळ | द | | लो | क | स | भा | | ना | ट | क |
| र | | | ना | क | | वा | व | | ही | | |
| जो | पा | स | ना | | ध | न | | आ | त्या | | च |
| शी | र | | | | नं | | | स | ला | म | त |
| | ख | रा | | गा | ज | र | | न | ड | | को |
| | | म | ग | | य | म | क | | र | ब | र |
| बा | र | दा | न | | मुं | | म | र | क | ट | |
| रा | व | स | | सं | डे | | कु | | शा | | |
| ख | | | ता | ग | | गा | व | | ला | तू | र |
| डी | म | | रा | त | | भा | त | | | प | सा |

## भविष्याचे रागरंग





**मेष-** संमिश्र फळे मिळतील. मनातील बदलांकडे लक्ष द्या. कामाच्या ठिकाणी स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. हेतु मनात धरून कामे कराल. महिलांनी शांत राहावे.




**वृषभ :** समोरील संधी सोडू नका. स्वत:चा फायदा लक्षात घेऊन वागाल. नवीन विचारांनी त्रस्त राहाल. ठोस निर्णयाची गरज आहे. भावंडांमध्ये प्रेमभाव राहील.




**मिथुन:** दिवसाची सुरुवात प्रफुल्लित होईल. स्थिर चित्ताने कामे सुरू करावीत. सुंदर वस्त्रे परिधान कराल. मनातील नकारात्मक विचार दूर सारा. आवडती व्यक्ति भेटेल.




**कर्क** - मानसिक अस्वस्थता जाणवेल. अंतिम निर्णयाला पोहोचायला वेळ लागेल. संबंधितांचे गैरसमज होऊ शकतात. वादापासून दूर राहा. आरोग्याची काळजी घ्यावी.




**सिंह :-** दिवस चांगला जाईल. मनाची द्विधावस्था टाळावी. नवीन कार्य हाती घेताना संपूर्ण विचार करावा. जवळचा प्रवास कराल.सहलीचा बेत आखाल. धनलाभ संभवतो.




**कन्या-** दिवस शुभ आहे. वरिष्ठ अधिकार्यांकडून फायदा होईल. कुटुंबात सामंजस्याचे वातावरण राहील. कामासाठी बाहेर गावी जावे लागू शकते. सरकारी कामात अधिक वेळ जाईल.





**तुळ :** दिवस सावधानतेने घालवावा. गैरसमजाला मनात थारा देऊ नका. रागावर नियंत्रण ठेवावे. अनैतिक कृत्ये करू नयेत. नामस्मरणाने लाभ होईल. राजकीय खेळ खेळू नका.





**वृश्चिक -** कामाची दगदग वाढेल. स्वत:साठी काही वेळ काढावा. थकवा जाणवेल. काही वेळेस माघार घेणे इष्ट ठरेल. अडथळ्यातून मार्ग काढावा.




**धनू -** दिवस समाधानात जाईल. स्वत:चे निर्णय स्वत: घ्या. जोडीदाराशी क्षुल्लक मतभेद संभवतात. राजकीय गोष्टींपासून दूर राहावे. प्रवासाचा बेत आखाल. आपली आवड जोपासाल.




**मकर:-** व्यापारात वाढ होईल. मनाजोगी कमाई करता येईल. महत्त्वाची कामे मार्गी लागतील. आज वैचारिक बदल दिसून येईल. सहकारी मदत करतील. आवश्यक ठिकाणीच खर्च कराल.




**कुंभ :** नवीन कामाची सुरुवात करू शकता. मत परिवर्तन होण्याची शक्यता आहे. महिलांनी सबुरीने वागावे. मुलांविषयी चिंता लागून राहील. भावंडांची मदत होईल. पोटाच्या तक्रारी राहतील.




**मीन :-** नावडत्या घटनांनी निराश होऊ नका. कौटुंबिक स्वास्थ्य जपावे. नातेवाईकांच्या गाठी पडतील. मनाची मरगळ दूर सारावी. वाहन जपून चालवावे. कागदपत्रे जपून ठेवावीत.




**१ बी.एच.के.फ्लॅट विकणे आहे.**

सांगोला शहरातील एखतपूर रोड वरील बनकरवस्ती येथील सर्व सोयीनीयुक्त १ बी.एच.के.फ्लॅट विकणे आहे.

(३ बालकनी, कन्सलंट वायरींग, ४ व्हीलर पार्कींग उपलब्ध)

संपर्क-मो.९४०४२४९५६८, ७४२०८४२४२१

**सिद्धनाथ एंटरप्राइजेस**

दुकान कामासाठी गरजू व होतकरू कामगार पाहिजे.

संपर्क:- चंद्रकला लेडीज वेअर शेजारी, मिरज रोड, सांगोला

मो. ९५१८३२६२४६

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः कसबे सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

कसबे सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर येथील जमिन सर्व्हे नंबर ७३८/१ क्षेत्र २हे-७१आर, आकार ५रू-३५ पैसे पैकी ०हे-५५.५०आर, आकार १रू-१० पैसे यासी चतुः सिमा : पुर्वेस-मल्लिकार्जुन घोंगडे यांचे क्षेत्र, दक्षिणेस-बाबा पुजारी यांचे क्षेत्र, पश्चिमेस-डांबरी रस्ता, उत्तरेस-डांबरी रस्ता, हि मिळकत प्रमोद महादेव घोंगडे व प्रसन्न महादेव घोंगडे यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची मिळकत असुन सदरची मिळकत ०हे-५५.५० आर हि प्रमोद महादेव घोंगडे व प्रसन्न महादेव घोंगडे यांनी आमचे अशिल यांना कायम खूश खरेदी देण्याचे ठरवून त्यांनी ईसारापोटी आमचे अशिलाकडून भरीव रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापुर्वी कोणासही विक्री, हस्तांतर, गहाण, दान, टाच, लीज अथवा अन्य मार्गाने गुंतवलेली नाही अशी हमी आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लीज, लीन, इजमेंटरी राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थाचा बोजा, नोटरी करार अगर इतर संस्थाचा बोजा असे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी लेखी स्वरूपात पुराव्यानिशी नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत अगर तक्रार न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहुन आलेल्या तक्रारीची अगर हरकतीची दखल घेतली जाणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन हि जाहिर नोटीस दिली.

ता.२५/१०/२०२४

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. नितीन धोंडीराम कांबळे**
**बी.ए.एल एल.बी.**
**मु.पो.सांगोला ता. सांगोला जि. सोलापूर**
**मो.८९९९२१३००४, ९५०३१९४०९९**

**सही**
**अशिल**
**मनोज दिगंबर कदम**
**रा.कौठुळी, ता.आटपाडी**

# स्वेरीतील एमबीएच्या विद्यार्थ्यांचा इन्व्हेस्टीसिया २०२४ या राष्ट्रीय परिषदेत सहभाग




पंढरपूर- मुंबई मधील बीएसई तथा 'बॉम्बे स्टॉक एक्सचेंज' या ठिकाणी झालेल्या 'इन्व्हेस्टीसिया २०२४' या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत स्वेरीच्या एमबीए विभागातील एकूण १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. १४ ऑक्टोबर ते दि.२० ऑक्टोबर २०२४ दरम्यान बीएसई (बॉम्बे स्टॉक एक्सचेंज) मध्ये वर्ल्ड इन्व्हेस्टर वीक निमित्ताने आयोजित केलेल्या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व विभागप्रमुख डॉ.कमल गलानी यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरच्या एमबीए विभागात दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणारे प्रशांत हरिदास गायकवाड, सुरज अर्जुन पाटोळे, सुयश सुभाष पावले, मनोज बापूसाहेब शिंदे, महेश संजय घाडगे, प्रज्वल नागनाथ मंठाळकर, सोहन सिद्धेश्वर म्हमाणे, दीपक दत्तू नाईकननवरे, आदित्य सतीश पाचोरे व ऋषिकेश श्यामसुंदर कोरडे या १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आशियातील सर्वात जुनी शेअर बाजारपेठ असलेल्या बीएसई मधील ही राष्ट्रीय परिषद विद्यार्थ्यांसाठी महत्वाची ठरली. या राष्ट्रीय परिषदेत एन.आय.एस.एम.चे संचालक शशी कृष्णन, सेबीचे सदस्य अनंत नारायण, बीएसईचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदरराम राममूर्ती, एमएसई चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी लतिका कुंडू, सीडीएसएलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नेहल वोरा, सेबी- गुंतवणूकदार जागरूकता विभागाच्या महाव्यवस्थापिका दीप्ती अग्रवाल आणि सेबी व एन.आय.एस.एम.चे मुख्य महाव्यवस्थापक दीपक त्रिवेदी, यांसारख्या अभ्यासू व्यक्तिमत्त्वांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. या राष्ट्रीय परिषदेत सहभागी झाल्याबद्धल विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि महाविद्यालयासाठी स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

## जाहीर नोटीस

एसआर नंबर ४१३/२०२४

सांगोला येथील मे.तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात

मारूती निवृत्ती दिघे — अर्जदार
विरूध्द
ग्रामसेवक, ग्रामपंचायत
वाढेगांव — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची मुलगी स्वाती मारूती दिघे हिचा जन्म मौजे वाढेगांव, ता.सांगोला, जि.सोलापूर येथे दिनांक २/६/१९८९ रोजी झालेला आहे. सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत वाढेगांवचे जन्म नोंदणी रजिष्टरला झालेली नाही. सदर जन्माच्या दाखलेचे अर्जदार यांना आवश्यक व जरूरी आहे. जन्माची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला धरून घेणेकरीता सदरचा अर्ज अर्जदार यांनी या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी ज्या कोणाची वरील नोंद धरून घेणेस हरकत असेल. त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे किंवा नेमलेली तारीख २९/११/२०२४ चे आत अथवा नेमलेले तारखेस स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहुन लेखी हरकत घ्यावी. अन्यथा अर्जदार यांची मुलगी स्वाती मारूती दिघे हिचे जन्माची नोंद धरून घेणे बाबत मे.कोर्ट योग्य तो हुकुम करतील. त्यानंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली. ता.१८/१०/२०२४

**सही**
**तहसीलदार, सांगोला**

जन्म/मृत्यू एसआर नंबर ४२९/२०२४ निशाण नंबर-

## जाहीर नोटीस

सांगोला येथील मे.तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी सो यांचे कोर्टात...

शंकर बिरा मेटकरी
वय ५५ वर्षे, धंदा शेती, — अर्जदार
रा.घेरडी, ता.सांगोला, जि.सोलापूर
विरुध्द
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत घेरडी, — सामनेवाला
ता.सांगोला, जि.सोलापूर.

ज्याअर्थी अर्जदार यांची मुलगी आरती शंकर मेटकरी हिचा जन्म दि. ०३/०२/२०१२ रोजी मौजे घेरडी, ता.सांगोला, जि.सोलापूर येथे अर्जदार यांचे राहते घरी झालेला आहे. परंतू अनावधानाने अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद मौजे घेरडी, ता.सांगोला येथील ग्रामपंचायतीचे जन्मनोंद नोंदणी रजिस्टर दप्तरी करणेचे अनावधानाने राहून गेलेले आहे. तरी अर्जदार यांना सदर मुलीच्या जन्माच्या दाखल्याची गरज भासल्याने अर्जदार यांनी मे.कोर्टात त्यांचे मुलीच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत दप्तरी नोंद धरणेकामी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणाची, त्याबाबत हरकत असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा नेमलेली ता.२९/११/२०२४ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत लेखी हरकत द्यावी अन्यथा अर्जदार यांना त्यांचे मुलीचे जन्माची नोंद धरुन घेवून दाखला देणेबाबत सामनेवाला यांना मे.कोर्ट योग्य ते हुकुम करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली. हुकुमावरुन ता.१८/१०/२०२४

**सही**
**तहसीलदार, सांगोला**

# जिल्हा स्तरीय तायक्वांदो स्पर्धेत हलदहिवडी विद्यालयाचे घवघवीत यश

हलदहिवडी (वार्ताहर):- जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत हलदहिवडी विद्यालयातील१४ वर्षे वयोगट मुली मध्ये नंदिनी बापू होवाळ इयत्ता सातवी हिने ३५ ते ३८ किलो वजन गटांमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला तसेच साक्षी राजेंद्र होवाळ इयत्ता आठवी हीने ३८ किलो वजन गटांमध्येतृतीय क्रमांक मिळवला तर १७ वर्षे वयोगटां मध्ये मुलींमध्ये हर्षदा बापू होवाळ इयत्ता दहावी तिने ६८ किलो वरील वजन गटात प्रथम क्रमांक मिळवून तिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे तसेच जाई राजेंद्र होवाळ इयत्ता नववी हीने तिने ४२ ते ४४ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक मिळवला.तायक्वांदो स्पर्धेसाठी प्रशिक्षक श्री.आबासाहेब वाघमोडे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विजेत्या खेळाडू मुलींचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड.श्री रमेश येडगे, ज्येष्ठ संचालक विश्वनाथ (नाना) चव्हाण तसेच संचालक विलास (बापू) येडगे, प्रा.सौ अपर्णा जानकर मॅडम, क्रीडा शिक्षक श्री चव्हाण एस डी सर, प्रशालेचे प्राचार्य श्री.रामचंद्र जानकर सर यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी हलदहिवडी ग्रामस्थ व शिरभावी ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

**अनुभवी विक्री प्रतिनिधी पाहिजे**

सांगोला शहरात खाद्यपदार्थांची विक्री करण्यासाठी अनुभवी विक्री प्रतिनिधी (सेल्समन) पाहिजे. गरजूंनी त्वरित संपर्क साधावा

संपर्क -श्री.सतीश चंद्र गुळमिरे (पतंजली आरोग्य केंद्र)

मो.८८०६५१८५६२

**करियर करण्याची सुवर्णसंधी**

| पद | जागा |
|---|---|
| कॅशियर | २ |
| डे-नाईट सिक्युरीटी गार्ड | २ |

अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे-२ आयडेंटी फोटो,बायोडाटा,आधार कार्ड,पॅन कार्ड

**कांबळे गोल्ड**
तिच शुध्दता... तोच विश्वास...
कांबळे कलेक्शन जवळ,कोष्टी गल्ली,सांगोला मो. 99232 67101

**प्लॉट विकणे आहे**

सांगोला शहरातील मिरज रोड वरील आदर्श प्राथमिक शाळेसमोरील २ गुंठे व ३ गुंठेचे गुंठेवारी असणारे प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहेत.

संपर्क:
9423236484, 9823931697

## दिपकआबांना आमदार करून विधानसभेत पाठवण्याचा ग्रामस्थांचा निर्धार ; आबांसाठी ग्रामस्थांनी जमा केली लोकवर्गणी



जवळा (प्रशांत चव्हाण):- दिपकआबा साळुंखे पाटील यांनी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केल्यापासून संपूर्ण सांगोला विधानसभा मतदारसंघातील त्यांच्या कार्यकर्त्यांत नवचैतन्य संचारले आहे. एवढी वर्षे इतरांसाठी काम केले. आता दीपकआबांना विजयी करायचे या ईर्षेने कार्यकर्ते पेटले आहेत. कोणत्याही परिस्थितीत दीपकआबांना आमदार करून विधानसभेत पाठवण्याचा निर्धार करत दीपकआबांनी आतापर्यंत केलेली कामे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्याची ग्वाही देत जवळा व आसपासच्या वाड्यावरस्त्यावरील नागरिकांनी दीपक आबांच्या प्रचारासाठी २७ लाख रुपयांची वर्गणी जाहीर केली.

शिवसेना उद्धव ठाकरे पक्षात प्रवेश केल्यानंतर प्रथमच दीपकआबा साळुंखे पाटील यांनी हाती मशाल घेऊन जवळा गावात रॉयल एन्ट्री केली. त्यांच्या स्वागताला हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. दीपकआबांना खांद्यावर उचलून घेऊन त्यांच्या कार्यकर्त्यांनी गावातून मिरवणूक काढली. दुपारपासूनच वाड्या वस्त्यावरील कार्यकर्ते जवळा गावात गर्दी करू लागले होते. सायंकाळी दीपकआबा साळुंखे पाटील यांचे जवळा गावात आगमन होताच कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. गावाच्या वेशीपासून त्यांच्या स्वागत मिरवणुकीला सुरुवात झाली. हलगीच्या कडकडाटात, फटाक्यांच्या आतषबाजीने त्यांचे स्वागत करण्यात आले. एकच वादा दीपकआबा या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना दीपकआबा साळुंखे पाटील म्हणाले, महाविकास आघाडीतून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मशाल चिन्ह घेवून उमेदवारी मिळाली आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर जवळा गावात पहिल्यांदा आल्यानंतर ग्रामस्थांचे प्रेम, सत्कार पाहून मी भारावून गेलो आहे.

गावभेट दौऱ्यावेळी तालुक्यातील गावे, वाड्यावस्त्यांवर फिरत असताना नागरिकांनी, आबा तुम्ही जनतेचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवावी असे सांगितले. गेल्या पाच वर्षांपूर्वी शहाजीबापूंना आमदार करण्यासाठी मदत केली. गेल्या ४० वर्षात निरपेक्ष भावनेने सर्वांना मदत केली. तळागाळातील प्रत्येक घटकातील लोकांना सोबत घेऊन काम केले. जनतेच्या दरबारात तुम्हाला मतदान करण्याची संधी आम्हाला द्या, अशी हाक जनतेने दिली. जनतेच्या आशीर्वादावरच जनतेचा उमेदवार म्हणून विधानसभेची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील पहिली उमेदवारी सांगोला मतदारसंघातून माझी जाहीर केली. त्यामुळे तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार म्हणून काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन दीपकआबा साळुंखे पाटील यांनी केले.

यावेळी जवळा, घेरडी, भोपसेवाडी, तरंगेवाडी, आगलावेवाडी, बुरंगेवाडी, डिकसळ, पारे या गावातील, वाड्यावर त्यांवरील हजारो कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.




## राज्यात पोलीस अलर्ट, २४ तासांत ५२ कोटींची रोकड जप्त; निवडणुक काळात कारवाई जोमात




मुंबई : राज्यात विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १५ ऑक्टोबरपासून महाराष्ट्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत १५ ते २४ ऑक्टोबरपर्यंत या १० दिवसांत एकूण ९० कोटी ७४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. त्यापैकी, गेल्या २४ तासात ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. दरम्यान, आज पुण्यात सोन्याची वाहतूक करणाऱ्या टेम्पोचीही पोलिसांनी तपासणी केली होती. तर, दोन दिवसांपूर्वी खेड-शिवापूर येथे एका कारमधून ५ कोटींपेक्षा जास्त रोकड जप्त करण्यात आली होती. त्यानंतर, आज जळगाव आणि बीडमध्येही रोकड जप्त करण्यात आली आहे.

निवडणूक आचारसंहितेच्या काळात सजगपणे कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्यातील १९ अमलबजावणी यत्रणांनी एका दिवसात ५२ कोटी रुपयाची मालमत्ता जप्त करण्याची कामगिरी बजावली आहे. विविध ठिकाणी वापरलेले पोलिस विभाग आणि इतर यंत्रणाची तपासणी नाके योग्य पध्दतीने कार्यरत असल्यामुळे हे यश मिळाले आहे.

## कोळे आनंद बाल मंदिरचे तायक्वांदो स्पर्धेत यश



कोळे (वार्ताहर) -नुकत्याच झालेल्या शालेय तायक्वांदो स्पर्धेमध्ये आनंद बाल मंदिर कोळे येथील विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी दादासो अनवाणे (प्रथम क्रमांक), श्रेया संतोष आलदर (प्रथम क्रमांक), सोहम पंढरी आलदर (द्वितीय क्रमांक).पुणे येथे होणाऱ्या विभाग स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

शाळेचे संस्थापक अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक बाळकृष्ण बंडगर सर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




10 गुंठे जागा विकणे आहे
सांगोला तालुक्यातील चिंचोली गावच्या हायवे रोडला लागून असलेली, १० गुंठे मोकळी जागा विकणे आहे.
संपर्क:9869028742

## सांगोला मतदारसंघात शेकाप आणि ठाकरे गटातील वाद मिटणार का..?

सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला मतदारसंघात मागील निवडणुकीत शहाजी बापू पाटील हे विजयी झाले होते. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शहाजी पाटील यांनी ठाकरेंची साथ सोडली. त्यानंतर या मतदारसंघात उद्धव ठाकरेंकडून दुसऱ्या उमेदवाराची चाचपणी सुरू होती. गेल्या निवडणुकीत आघाडीकडून हा मतदारसंघ शेकापला सोडण्यात आला होता. या मतदारसंघात ५० वर्ष गणपतराव देशमुख यांच्या माध्यमातून शेकापने नेतृत्व केले आहे. त्यामुळे ही जागा शेकापला सोडावी अशी त्यांची मागणी होती. परंतु ठाकरे गटाने या मतदारसंघात नुकतेच अजित पवारांच्या राष्ट्रवादीतून ठाकरे गटात प्रवेश केलेले दीपक आबा साळुंखे यांना उमेदवारी जाहीर केली. तर शेकापनेही या मतदारसंघात बाबासाहेब देशमुख यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे सांगोला मतदारसंघात शेकाप आणि ठाकरे गटातील वाद शरद पवारांच्या मध्यस्थीने मिटणार का, शरद पवारांनी शेकापला दिलेला शब्द लक्षात घेऊन ठाकरे उमेदवार बदलणार का हे काही दिवसांत स्पष्ट होईल.

विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गटाची पहिली यादी जाहीर झाली. त्यात सांगोला मतदारसंघात दीपक आबा साळुंखे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. मात्र या जागेवरील उमेदवार बदलणार का अशी चर्चा सुरू आहे. सांगोला जागेवर मविआतील घटकपक्ष शेतकरी कामगार पक्षाने दावा केला आहे. ही जागा शेकापला द्यावी यासाठी शरद पवारही आग्रही आहेत. शरद पवार आणि देशमुख कुटुंबाचे जवळचे संबंध आहेत. त्यामुळे मविआत जर संघर्ष झाला तर देशमुखांच्या पाठीशी शरद पवार १०० टक्के राहतील असा विश्वास शेकाप नेते जयंत पाटील यांनी व्यक्त केला आहे.

शेकापने या मतदारसंघात बाबासाहेब देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली आहे तर ठाकरे गटाने दीपक आबांना रिंगणात उतरवलं आहे. महाविकास आघाडीत या जागेवरून संघर्ष सुरू आहे. त्यात शरद पवारांच्या मध्यस्थीने काही तोडगा निघतो का हे पाहणे गरजेचे आहे. सांगोल्यात शेकापने बाबासाहेब देशमुखांना उमेदवारी जाहीर केली ती शरद पवारांच्या चर्चेनंतरच केल्याचं जयंत पाटील यांनी म्हटलं आहे. तर २०१९ मध्ये ही जागा शिवसेनेने जिंकली होती. त्यामुळे या जागेवर आम्ही उमेदवार घोषित केला आहे. त्याबाबत चर्चा सुरू आहे असं संजय राऊतांनी सांगितले आहे. तर आमच्या नेत्यांचं माहिती नाही, परंतु जर उद्या तिथे डॉ. बाबासाहेब देशमुख यांना जवळून ओळखतो. त्यांनी मला प्रचाराला बोलावले तर मी त्याठिकाणी नक्कीच जाईन. कारण १-२ जागा अशा आहेत जिथे ज्या गोष्टी घडायला नको त्या घडल्यात. तरीसुद्धा उद्धव ठाकरे पक्षातील नेते नक्कीच काही मतदारसंघाबाबत फेरविचार करतील. मोठं मन दाखवतील आणि सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे असं विधान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी केले आहे.

### पाच जागा द्या, नाहीतर २५ जागांवर लढू', महाविकास आघाडीला थेट अल्टिमेटम

मुंबई:- महाराष्ट्राच्या निवडणुकीला आता काही दिवसांचा अवधी उरला आहे. मात्र महाविकास आघाडीत जागावाटपाचा प्रश्न अजूनही कायम आहे. एकीकडे महायुतीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद) आणि शिवसेना (यूबीटी) या तीन बड्या पक्षांनी ८५-८५ जागांवर निवडणूक लढवण्याची घोषणा केली असताना, दुसरीकडे अन्य पक्षांच्या दाव्यांबाबतही खडाजंगी सुरू आहे. समाजवादी पक्षाने महाविकास आघाडीला एक दिवसाचा अल्टिमेटम दिला आहे. सपाने ५ जागांची मागणी केली आहे. तसे न झाल्यास २५ जागांवर उमेदवार उभे करण्याचा इशारा देण्यात आला आहे.




## शिखर शिंगणापूर ते कपिलधार पदयात्रेचे आयोजन



नाझरा (वार्ताहर):- सालाबाद प्रमाणे यावर्षीही गुरुवर्य नीलकंठ शिवाचार्य धारेश्वर महास्वामींच्या मार्गदर्शनाखाली शिखर शिंगणापूर ते कपिलधार पदयात्रेचे रविवार दिनांक ३ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर अखेर आयोजन केले असल्याचे मा. सरपंच रावसाहेब चौगुले यांनी सांगितले.

सदर पद यात्रेत भजन, प्रवचन, कीर्तनाच्या माध्यमातून संत शिरोमणी मनमत स्वामी महाराज यांचे समाधी दर्शन तसेच शेकडो शिवाचार्य माहेश्वर व लाखो शिवभक्ताच्या संख्येने भक्तगण उपस्थित राहणार आहेत. यावेळी सदभक्तांनी आवश्यक कपडे, गरम कपडे, पावसाळी कोट, छत्री, वही, पेन, परम रहस्य ग्रंथ, ताट, तांब्या इत्यादी साहित्य सोबत आणावेत. तसेच रविवार दिनांक ३ नोव्हेंबर रोजी शिखर शिंगणापूर येथे शिवभक्तांनी मुक्कामास यावे, असे आवाहन संयोजकाच्यावतीने करण्यात आले.

